# पुणे विद्यापीठ

## परिपत्रक

**शासकीय दक्षिणा अधिछात्रवृत्ती व शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती**
**सन २०१४—१५ मधील अंमलबजावणीबाबत**

शासनाने शासन पत्र क्र. उशिसं/१४ अई/दक्षिणा व संशो. अधि. छात्रवृत्ती/९८ दिनांक १७/६/२०१४ अन्वये शासकीय दक्षिणा अधिछात्रवृत्ती व शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती सन २०१४—१५ करीता अर्ज मागविण्यात आलेले आहे. सोबत शासन पत्राची प्रत जोडत आहे. सदर शिष्यवृत्ती संदर्भातील अधिकची माहिती व विहित नमुन्यातील अर्ज www.dhepune.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

पात्र विद्यार्थ्यांनी परिपूर्ण भरलेले अर्ज आपल्या विभागामार्फत / महाविद्यालयामार्फत विहित मुदतीच्या आत शासनाकडे सादर करावेत.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७. )
संदर्भ क्र. शै.प्रवेश/२६४४ )
दिनांक : २१. ०७. २०१४ )

सहा. कुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत :

मा. विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.
मा. प्राचार्य/ संचालक , सर्व संलग्नित महाविद्यालये, पुणे विद्यापीठ, पुणे.

आपणास विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील / महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावे.

Inward No.: 3495
Date: 10/7/2014
BCUD
University of Pune

महाराष्ट्र शासन
संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
web: www.dhepune.gov.in E-mail: dhepune@yahoo.co.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स नं.०२०/२६१११५३

क्र.उशिसं/१४ अई/ दक्षिणा व संशो.अधि.छात्रवृत्ती /eC दिनांक - १७-६-२०१४

3900
11/7/2014

कालमर्यादित -

परिपत्रक-

विषय – शासकीय दक्षिणा अधिछात्रवृत्ती व शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती सन २०१४-१५ मधील अंमलबजावणीबाबत...

शासन निर्णय क्रमांक एससीएच १०६५-यु दिनांक १९-९-१९६५ अन्वये दक्षिणा अधिछात्रवृत्ती करिता शासनाने खलीलप्रमाणे शासकीय महाविद्यालये/विज्ञान संस्था/अकृषि विद्यापीठ निहाय संच निर्धारित केलेले आहेत.

## (१) शासकीय दक्षिणा अधिछात्रवृत्ती

अ) शासकीय महाविद्यालये व विज्ञान संस्था स्तर –

| | | |
|---|---|---|
| १. | एलिफिस्टन महाविद्यालय, मुंबई | ६ |
| २. | विज्ञान संस्था, मुंबई | ६ |
| ३. | ईस्माईल युसुफ महाविद्यालय, जोगेश्वरी, पूर्व, मुंबई | ४ |
| ४. | सिडनहॅम महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई | ४ |
| ५. | शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई | ४ |
| ६. | राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर | ६ |
| ७. | विज्ञान संस्था, नागपूर | ६ |
| ८. | कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर | ६ |
| ९. | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती | ६ |
| १०. | शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद | ६ |
| | एकूण - | ५४ |

मा. कुलसचिव कार्यालय
पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक क्र.-आर/ 2079
09/07/14
10/07/14
D/BCUD

ब) अकृषि विद्यापीठ स्तर –

| | | |
|---|---|---|
| १. | मुंबई विद्यापीठ, मुंबई | ४ |
| २. | एन एन डी टी महिला विद्यापीठ, मुंबई | २ |
| ३. | पुणे विद्यापीठ, पुणे | ४ |
| ४. | नागपूर विद्यापीठ, नागपूर | ४ |
| ५. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | ४ |
| ६. | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४ |
| | एकूण - | २२ |

उपरोक्त दक्षिणा अधिछात्रवृत्तीसाठी प्राचार्य, शासकीय महाविद्यालये, संचालक, विज्ञान संस्था व कुलसचिव, अकृषि विद्यापीठें यांनी खालीलप्रमाणे कालमर्यादेत कार्यवाही करावी.

१. अर्ज वितरण व स्विकृती दिनांक ०१-७-२०१४ ते ३१-०७-२०१४ निवड समितीमार्फत
२. निवड प्रक्रिया दिनांक ०१-८-२०१४ ते १५-०८-२०१४ पूर्ण करणे.
३. प्रस्ताव नवीन मंजूरी व नूतनीकरण सर्व पात्र छात्रांच्या माहितीसह या संचालनालयास दिनांक २०-०८-२०१४ पर्यनत सादर करावेत.
४. आपणांस विहीत (निर्धारीत) केलेले संच सर्वच खर्ची पाडावेत रिक्त संच ठेवू नये.
५. दिनांक २०-०८-२०१४ पर्यन्त प्रस्ताव या संचालनालयास प्राप्त न झाल्यास दिनांक २०-०८-२०१४ नंतर प्रस्ताव सादर केलेल्या संबंधीत अधिछात्रांना दक्षिणा अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यांत येणार नाही, याबाबतची जबाबदारी संपूर्णतः आपल्यावरच राहील.
६. नूतनीकरणाचे प्रस्ताव छात्रांचे वार्षिक प्रगती अहवाल व प्रथम वर्षाची गुणपत्रिकासह व इतर सर्व माहितीसह दिनांक २०-८-२०१४ पर्यन्त सादर करावेत. तदनंतर सादर केलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

## (२) शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती :-

शासन निर्णय शिक्षण सेवायोजन विभाग क्रमांक एससीएच-१०८२/४१९९/विशि-३ दिनांक १३-८-१९८५ अन्वये महाविद्यालयीन स्तर शासकीय महाविद्यालये/शासकीय विज्ञान संस्था/राज्यस्तर अकृषि विद्यापीठातील खालीलप्रमाणे शासनाने संच निर्धारित केलेले आहेत. सदर **शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती पीएचडी अभ्यासक्रमांसाठी** प्रथम वर्ष नवीन मंजूरी व द्वितीय व तृतीय वर्षासाठी नूतनीकरणासाठी देय आहेत.

**अ) अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांकरिता संच-** -- ३

**एकूण (अ) ३**

**ब) शासकीय महाविद्यालयीन स्तर -**

| | | |
|---|---|---|
| १. | विज्ञान संस्था, मुंबई | ३ |
| २. | विज्ञान संस्था, नागपूर | ३ |
| ३. | विज्ञान संस्था, औरंगाबाद | ३ |
| ४. | शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्था, अमरावती | १ |
| ५. | वसंतराव नाइ र्क शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर | १ |
| | **एकूण (ब)** | **११** |

**एकूण (अ व ब) संच -- १४**

उपरोक्त संचांसाठी प्राचार्य शासकीय महाविद्यालये व संचालक, विज्ञान संस्था यांनी आपणांस विहीत संचास अधीन राहून पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. अर्ज वितरण दिनांक ३१-७-२०१४ पर्यन्त
२. अर्ज स्वीकृती दिनांक ०१-०८-२०१४ ते १४-८-२०१४ पर्यन्त
३. गठीत समिती दिनांक ०५-०८-२०१४ पर्यन्त
४. गठीत समितीस या संचालनलायाची मान्यता दिनांक १५-०८-२०१४
५. अधिछात्र निवड दिनांक २०-०८-२०१४ पर्यन्त
६. निवड प्रक्रियापूर्व प्रस्ताव या संचालनालयास पाठविण्याचा अंतिम दिनांक ३०-०८-२०१४

दिनांक ३०-०८-२०१४ नंतरचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी. आपणास विहीत केलेले संच खर्ची पाडावेत. नूतनीकरणाचे अर्ज विद्यार्थ्यांकडून मागवून घेवून त्यावर कार्यवाही व्हावी. एकही संच रिक्त ठेवू नये.

**(अ) नवीन मंजूरी --**

१. ज्या विद्यार्थ्यांने बी ए/बी एस्सी/ब्री एड ही पदवी भारतातील कोणत्याही संविधीमान्य विद्यापीठाची प्राप्त केली असेल व भारतातील विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी किंवा भारताबाहेरील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी प्राप्त केली असेल व ज्यांचा संविधीमान्य विद्यापीठाच्या पी. एच. डी. किंवा डी. एस्सी. हया पदवीसाठी मार्गदर्शकाने स्वीकार केला असेल अशा विद्यार्थ्यांना हया संशोधन अधिछात्रवृत्या देण्यांत येतात. ज्या विद्यार्थ्यांने बी ए/बी एस्सी/ बी एड व एम ए/एम एस्सी/एम एड यापैकी कोणत्याही एका पदवी परीक्षेत प्रथम श्रेणी प्राप्त केली आहे व अन्य पदवी परीक्षेत किमान किमान द्वितीय श्रेणी प्राप्त केली आहे, त्यांना या अधिछात्रवृत्तीसाठी पात्र समजले जाते.

२. विज्ञान संस्था-मुंबई, नागपूर, औरंगाबाद येथे जर एखाद्या वर्षी वरील अट पूर्ण करणारे विद्यार्थी उपलब्ध नसतील तर त्यावर्षी ज्या विद्यार्थ्यांनी बी एस्सी पदवी किमान दुस-या श्रेणीत संपादन केली असेल व एम एस्सी पदवी दुस-या श्रेणीत (पेपर्सद्वारे) किंवा (संशोधनाद्वारे) संपादन केली असेल असे विद्यार्थी या अधिछात्रवृत्तीसाठी पात्र समजले जातील.

३. अधिछात्रांनी जो विषय निवडला असेल त्या विषयासाठी विद्यापीठाने मान्यता दिलेल्या मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली अधिछात्रांना पूर्णवेळ संशोधन कार्य करावे लागेल.

४. शासकीय संस्थामध्ये संशोधन करणा-या अधिछात्रास शिक्षण शुल्क द्यावे लागणार नाही. तथापि, अशासकीय संस्थांमध्ये संशोधन करीत असणा-या अधिछात्रास नियमानुसार शिक्षण शुल्क द्यावे लागेल..

५. अधिछात्रवृत्तीच्या कालावधीमध्ये नियम क्रमांक ९ (ब) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे अध्यापकाचे पद वगळता अधिछात्रास कोणतीही इतर पगारी अगर कोणत्याही त-हेची नियुक्ती, विद्यावेतन संशोधन अधिछात्रवृत्ती स्वीकारता येणार नाही.

६. अधिछात्रास अधिछात्रवृत्तीची मुदत संपण्याआधी अधिछात्रवृत्ती सोडून द्यावयाची असल्यास शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांची पूर्वसंमती घ्यावी लागेल.

**ब) नूतनीकरण –**

१. अधिछात्राचे पीएचडी द्वितीय व तृतीय वर्षाचे सर्वकष वार्षिक प्रगती अहवाल, तसेच प्रथम व द्वितीय वर्षाचे संशोधन विषयक प्रमाणपत्र योग्य त्या प्रपत्रात उच्च शिक्षण संचालनालयास पाठवावे. तसेच, अधिछात्रांचे संशोधन कार्य प्रसिध्द झाले असल्यास त्याची एक प्रत उच्च शिक्षण संचालनालयास पाठवावी.

२. नूतनीकरणाच्या रकमा अधिछात्रांना या संचालनालयाकडून मंजूर करण्यांत येतील . त्या सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षातच खर्ची पाडणे अत्यावश्यक आहे.

## (३) शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती :-

(राज्यस्तरीय (३) संच)

राज्यस्तरासाठी एकूण ३ संच मंजूर आहेत. राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमधील तीन पीएचडी (संशोधनपर) शिक्षण घेणा-या पात्र अधिछात्रांनी विहीत अधिछात्रवृत्तीसाठी विहीत नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रे/सहपत्रासह संपूर्ण माहिती-शिफारशीसह उच्च शिक्षण संचालनालयास दिनांक १४-८-२०१४ पर्यन्त पाठवावेत. तदनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

उपरोक्त संच निवडीसाठी शिक्षण संचालक उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत करुन निवड केली जाईल.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या नजिकच्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडणे बंधनकारक असून, विद्यार्थ्यांचा खाते क्रमांक बँकेचा संपूर्ण, पत्ता बँक शाखा, शाखा कोड, आय एफ एस सी कोड क्रमांक तसेच बँकेचा एम आय सी आर कोड क्रमांक इत्यादि माहिती बिनचूकपणे अर्जात नमूद करणे बंधनकारक आहे.

**शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे – १**

प्रत –

१. संचालक, शासकीय विज्ञान संस्था, मुंबई / नागपूर / औरंगाबाद

२. सर्व प्राचार्य, शासकीय महाविद्यालये, [illegible]